# 'प्रबोधनामुळे जीवनाला निश्चित दिशा मिळाली'

## 'सकाळ'च्या उपक्रमात विद्यार्थ्यांचे मनोगत

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : "प्रबोधनामुळे जीवनाला निश्चित दिशा मिळाली आहे. न्यूनगंडाची भावना मनातून गेली आहे. आत्मविश्वास निर्माण झाला आहे,' अशी मते विद्यार्थ्यांनी आज येथे मांडली. यशस्वी जीवनाचा कानमंत्र घेऊनच विद्यार्थी येथून बाहेर पडले. उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

'सकाळ' आणि 'मनोविकास प्रबोधिनी'च्या वतीने कमला महाविद्यालयात 'अपयशातून यशाकडे' हा उपक्रम सुरू आहे. या उपक्रमात आज विद्यार्थ्यांनी मते व्यक्त केली. उद्या (ता. २९) उपक्रमाचा समारोप होईल.

दहावी अनुत्तीर्ण झालेल्या, अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळालेल्या, अपेक्षित गुण मिळूनही पुढे काय करावयाचे, या बाबत गोंधळलेल्या विद्यार्थ्यांना व पालकांना समुपदेशनातून मानसिक आधार देण्यासाठी हा उपक्रम सुरू आहे.

उपक्रमात प्रबोधिनीच्या वतीने विद्यार्थ्यांकडून माहिती भरून घेण्यात आली. त्यामध्ये विद्यार्थ्यांची व पालकांची मानसिक अवस्थेची चाचणी करून त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

अपयशाने जीवनात खचून जायचे नसते. अपयशावर मात करून यश मिळवायचे असते. त्यासाठी अशा उपक्रमातून एक निश्चित दिशा मिळाल्याचा विश्वास विद्यार्थ्यांनी येथे व्यक्त केला. अभ्यासपद्धतीचा अवलंब, विषयांची भीती, जीवनाचे भान, विषयांची निवड, शिक्षण व जीवन, मानसिक ताणतणाव दूर झाल्याचे मत विद्यार्थ्यांनी नोंदविले. मुलगा तिसऱ्यांदा परीक्षेत अनुत्तीर्ण झाला. त्याला इतिहास विषयात कमी गुण मिळाले. या पूर्वीच मुलाला अशा मार्गदर्शनाचा लाभ मिळाला असता, तर मुलाचे शैक्षणिक आयुष्य चांगले झाले असते. निराश झालेल्या विद्यार्थ्यांना आधार देण्याचे काम या उपक्रमाने केल्याचे मत अनेक पालकांनी नोंदविले.

या वेळी प्रा. एस. जी. माळी, प्रा. अनिल घस्ते, प्रा. व्ही. डी. तडसरे, प्रा. डॉ. ए. एस. परीट, प्रा. व्ही. एम. मगदूम, प्रा. भरत नाईक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उद्या (ता. २९) प्रा. सौ. छाया माळी, बी. बी. कदम, नीता लाड मार्गदर्शन करतील. सकाळी दहा ते सायंकाळी पाचपर्यंत हा उपक्रम सुरू राहील.